# एसीसीचे 'कोस्टल' बाजारात




एसीसी लिमिटेडच्या दक्षिण व पश्चिम क्षेत्राचे विक्री संचालक पी. एन. अय्यर व अन्य.

पणजी | दि. १६

**भारताची** प्रमुख सिमेंट निर्माती कंपनी व सिमेंट-काँक्रिट तंत्रज्ञानामध्ये अग्रगण्य कंपनी एसीसी लिमिटेडचे आज गोव्यामध्ये महत्त्वपूर्ण पर्यावरणीयदृष्ट्या अनुकूल सिमेंट ब्रँड 'कोस्टल+' बाजारात दाखल झाले आहे. 'कोस्टल+' तंत्रज्ञानदृष्ट्या अद्ययावत सिमेंट असून हे किनाऱ्यावरील प्रदेशाच्या हवामानापासून उत्कृष्ट सुरक्षा देते.

किनाऱ्यावरील प्रदेशांचे हवामान हे फारच हानीकारक असते, जे आपण राहात असलेल्या घरांसह काँक्रिट बांधकामांचे नुकसान करते. समुद्राच्या हवेमध्ये व जमिनीतील पाण्यामध्ये असलेले क्लोराईड व गंधकाचे क्षार काँक्रिटच्या बांधकामावर कठोररित्या आघात करतात. त्यामुळे बांधकाम रचनेचा टिकाऊपणा कमी होतो.

'कोस्टल+' पासून बनविण्यात येणारे काँक्रिट हे अधिक संलग्न असते. म्हणूनच याच्या काँक्रिट बांधकामामध्ये सामान्य सिमेंटपासून करण्यात आलेल्या बांधकामापेक्षा कमी झिरपण्याची क्षमता असते. कमी झिरपण्याच्या क्षमतेमुळे क्लोराईड व गंधकाच्या क्षारांचा आघात होण्यापासून उच्च सुरक्षा प्राप्त होते. यामुळे आपली घरे अधिक टिकाऊ बनतात.